# धडा पाठ 13

## घराच्या शोधात

**पांडे :** इथं जवळपास कुठं भाड्यानं घर मिळेल का हो?

**रामराव :** हो, मिळेल की! सध्या या भागात खूप घरं आहेत. नवीन वस्ती आहे ना! पण कसं घर हवं आहे तुम्हाला? स्वतंत्रच घर शोधणार असाल नं तुम्ही?

**पांडे :** बघूया कस जमतंय ते! घर तर हवंय छोटसंच, एक खोली, एक बैठकीची खोली, स्वयंपाकघर, संडास-न्हाणीघर.

**रामराव :** स्वतंत्र घर म्हणजे, बंगला हवाय? आजूबाजूला बाग वगैरे? की फ्लॅट हवा आहे?

**पांडे :** स्वतंत्र घरच चांगलं असतं. पण भाडं फार पडेल ना?

**रामराव :** कमीत कमी पाच हजार तरी पडतील.

**पांडे :** बापरे! मला परवडणार नाही. माझी कुवत फक्त रोन-अडीच हजार रुपयांपर्यंतच आहे.

**रामराव :** मग एखादा फ्लॅट मिळेल. स्वतंत्र घरासाठी मात्र गावापासून थोडं दूर जावं लागेल. ते तुम्हाला चालणार का?

**पाडे :** चालेल.

**रामराव :** अहो, पण गावातच घर घेणं चांगलं तुमचे जाण्यायेण्याचे पैसे वाचतील ना!

**पांडे :** तरीही पाच हजार फार होतील.

## मकान की खोज में

**पांडे :** यहाँ आसपास में कहीं किराये का मकान मिलेगा क्या?

**रामराव :** हाँ, मिलेगा न। आजकल इस इलाके में बहुत से मकान खाली हैं। नई बस्ती है न! पर तुम्हें कैसा घर चाहिए?

**पांडे :** छोटा सा ही। एक कमरा, एक बैठक, रसोई-घर, शौचालय और स्नान घर।

**रामराव :** आपको अलग मकान, बंगला चाहिए? आस पास बाग बगीचे वाला? या फ्लैट चाहिए?

**पांडे :** अलग मकान ही अच्छा है। पर उसका तो किराया बहुत ज़्यादा होगा न?

**रामराव :** कम से कम पाँच हजार तो होगा ही।

**पांडे :** बाप रे! मेरी क्षमता सिर्फ दो-ढ़ाई हजार रुपयों तक ही है।

**रामराव :** तब तो एकाछ फ्लैट मिलेगा। अलग मकान के लिए तो बस्ती से दूर जाना पड़ेगा। वह आप चलेगा क्या?

**पांडे :** चलेगा।

**रामराव :** लेकिन बस्ती में ही मकान तेना अच्छा। आप के आने जाने के पैसे बचेंगे।

**पांडे :** फिर भी पाँच हज़ार तो बहुत होंगे।

**शमराव :** मी तुम्हाला इथं जवळच एक घर दाखवीन. पहा पटतंय का? शाम, तू जरा दुकानात बसशील का? मी जरा यांच्याबरोबर बाहेर जाणार आहे. आम्ही तासाभरात परत येणार असू. सगळीकडे नीट लक्ष ठेवशील ना?

**शाम :** ठेवीन हो.

**रामराव :** चला तर, आपण आता चांगलं घर शोधणार आहेत.

**पांडे :** हो, तुमची एवढी मदत आहे. मग आपण चांगलं घर नक्की शोधणार.

**रामराव :** हो हो. आम्ही तुमच्यासारख्या घनिष्ठ मित्रासाठी चांगलं घर शोधणारच. कमी भाडं आणि सगळ्या सुखसोयींचं घर. "आखूड शिंगी बहुगुणी गाय."

**रामराव :** मैं तुम्हें यहीं पास में एक मकान दिखाऊँगा। देखो पसंद आएगा क्या? पसंद श्याम तुम जरा दुकान पर बैठोगे क्या? मैं इन के साथ जरा बाहर जानेवाला हूँ। एक घंटे में वापस आऊँगा। अच्छी तरह ध्यान रखोगे न?

**शाम :** जी हाँ, रखूँगा।

**रामराव :** चलो चलें। हम अब अच्छा घर ढूँढनेवाले है।

**पांडे :** हाँ, तुम्हारी इतनी मदद है। फिर हम अच्छा मकान जरूर ढूँढेंगे।

**रामराव :** हाँ, हाँ. हम तुम्हारे जैसे घनिष्ठ मित्र के लिए अच्छा मकान ढूँढेंगेही। कम किराया और सभी सुविधाओं वाला मकान। हींग लगे न फिटकरी, रंग भी चोखा आए।

**शब्दार्थ**

| | |
|---|---|
| जवळपास | नजदीक |
| भाड्याचे घर | किराये का मकान |
| नवीन वस्ती | नई बस्ती |
| स्वतंत्र घर | अलग मकान |
| कुवत | क्षमता |
| छोटसं | छोटा सा |
| बैठकीची खोली | बैठक, बैठक का कमरा |
| स्वयंपाकघर | रसोई-घर |
| संडास | शौचालय |
| न्हाणीघर | स्नान घर |
| भाडं | किराया |
| फार | ज़्यादा |
| कमीतकमी | कम से कम |
| मला परवडणार नाही | मेरे बस का नहीं |
| दोन अडीच हजार | दो-ढाई हजार |
| गावापासून दूर | बस्ती से दूर |
| जाण्यायेण्याचे | आने-जाने के |

| | |
|---|---|
| वाचतील | बचेंगे |
| तरीही | फिर भी |
| जवळच | पास ही |
| दाखवीन | दिखाऊँगा |
| पटणे | पसंद आना, अच्छा लगना |
| यांच्याबरोबर | इन के साथ |
| बाहेर | बाहर |
| तासाभरात | एक घंटे में |
| लक्ष ठेव | ध्यान दो |
| चला घर शोधणारआहोत | चलो मकान ढूँढनेवाले है |
| आखूड | लंबाई में छोटा |
| शिंग | सींग |
| बहुगुणी | बहुत गुणोंवाली |
| काल | कल |

## अभ्यास

**I नीचे दिए गए प्रश्नों के उत्तर दीजिए।**

1) रामराव राहतात त्या भागात खूप घरं रिकामी का आहेत?
2) पांडेना घर कसं हवं आहे?
3) पांडे घरभाड्यासाठी दर महिन्याला किती पैसे खर्च करू शकतात?
4) गावातच घर घेतल्याने पांडेना काय फायदा होतो?
5) 'आखूड शिंगी बहुगुणी गाय' ह्या म्हणीचा अर्थ स्पष्ट करा.

**II उदाहरण के अनुसार वाक्य बनाइए।**

1. *उदाहरण:* मी आज बाजारात जाणार आहे.
   1) मी सकाळी शाळेत .......... . (ये)
   2) तू प्रियाकडे चहा .......... . (पी)
   3) मी आज दुपारी पुस्तक .......... . (वाच)
   4) मी परवा सिनेमा .......... . (पहा)
   5) आम्ही आता आंबे .......... . (खा)
   6) तुम्ही नाटकासाठी बाहुल्या .......... . (आण)
   7) तो आज मीटिंगला .......... . (जा)
   8) आपण खेळ .......... . (खेळ)

2. *उदाहरण:* मी अभ्यास करीन.
   1) मी खोली स्वच्छ ........ . (कर)

2) तू सहलीला ........ . (जा)
3) आम्ही फुलं तोडायला ........ . (जा)
4) तुम्ही संध्याकाळी सिनेमा ........ . (दाखव)
5) उमेश आज गुलाबाची फुले ........ . (आण)
6) प्रिया स्पर्धेत भाग ........ . (घे)
7) त्या दोघी धबधब्याखाली उभ्या ........ . (राह)
8) बाबा टी.व्ही. वर सिनेमा ........ . (बघ)
9) ती पिल्लं बाहेर ........ . (ओरड)
10) आपण सर्व गाणी ........ . (ऐक)

**III उदाहरण के अनुसार नीचे दिए गए वाक्यों के निषेध वाचक रूप बनाइए।**

*उदाहरण:* उमेश अहमदाबादला जाणार <u>आहे</u>.
उमेश अहमदाबादला जाणार <u>नाही</u>.

1) मी बाळाला डॉक्टरकडे घेऊन जाणार आहे.
2) मला खाऊ मिळणार आहे.
3) तू बटाटेवडे आणणार आहेस.
4) तुम्ही खंडाळ्याला जाणार आहात.
5) आम्ही नाटकात काम करणार आहोत.
6) खलनायक येऊन नायिकेला पळवणार आहे.
7) सुमन वसतिगृहात राहणार आहे.
8) त्या दोघी रंगीबेरंगी फुले तोडणार आहेत.
9) ती दोन्ही पिल्लं घर सोडून जाणार आहेत.
10) आपण आज सिनेमा पाहून हसणार आहोत.

**IV उपयुक्त शब्दों का प्रयोग कर अनुच्छेद पूरे कीजिए।**

1. सुधा, तू आज कुठे ........ ........? मी तुझ्याबरोबर ........ का? आपण दोघी प्रियाकडे पण ........, तिथे आपण खेळ ........ . खेळताना दमलो की प्रियाची आई चहा ........ ........, चहा घेऊन आपण प्रियाबरोबर बागेत ........ .

ठीक आहे. तू माझ्याबरोबर ........ . पण मी सांगेन तसं तुला ........ ........ . बागेत तू एकाही फुलाला हात ........ ......., नाहीतर मी आईला ........ .

2. चल, आज आपण यात्रेत ........, आपल्याबरोबर सुधालाही ........ . यात्रेत खूप दुकाने ........ खेळणी, खाण्यापिण्याच्या वस्तू, पाळणे ........ . आपण खेळण्याच्या दुकानातून खेळणी ........ ........, जिलबी, बटाटेवडे ........ ........ . पाळण्यात ........, जादूचे खेळ ........ ........ . तेथे आपण फोटोही ........ ........ .

**V उदाहरण के अनुसार "लागेल" के साथ कोष्ठक में दिए गए शब्दों का प्रयोग कर वाक्य पूरे कीजिए।**

*उदाहरण:* स्वतंत्र घरासाठी थोडं दूर ........ ........ . (जाणे)
स्वतंत्र घरासाठी थोडं दूर जावं लागेल.

1) तुला शांताबरोबर तिच्या बाहुलीशी ........ ........ . (खेळणे)
2) मला उमेशबरोबर चहा ........ ........ . (पिणे)
3) रमेशसाठी खाऊ ........ ........ . (आणणे)
4) सुधाला पटना मिरचीच ........ ........ . (घेणे)
5) प्रियाला सामान घेण्यासाठी ........ ........ . (जाणे)
6) बाबांना प्रगतिपुस्तक ........ ........ . (दाखवणे)
7) ते नाटक मला ........ ........ . (बघणे)
8) प्रकाशला ती फाईल ........ ........ . (पाठवणे)
9) पिल्लांना उन्हातच ........ ........ . (खेळणे)
10) त्या मुलींना आज पावसात ........ ........ . (भिजणे)
11) हीरोला वेडंवाकडं ........ ........ . (नाचणे)
12) हरवलेले पुस्तक ........ ........ . (शोधणे)

**VI ठीक प्रकार से वाक्यांशों का मिलानकर वाक्य बनाइए।**

| | |
|---|---|
| कोणते खेळ | बघणार आहेस? |
| कोणता सिनेमा | खेळणार आहेस? |
| तू आज कुठे | सांगणार आहेस? |
| कुणाकुणाला | येणार आहेत? |
| काय गोष्ट | जाणार आहेस? |
| ते कुठून | देणार आहेस? |
| तो खाऊ कुणाला | बोलावणार आहेस? |
| प्रिया काय | शोधणार आहे? |

**VII उदाहरण के अनुसार वाक्य बनाइए।**

*उदाहरण:* राम धडा वाचेल. रामराव धडा वाचतील.

1) उमेश खाऊ आणेल. बाबा ..... .... .... .... .
2) तू ही साडी वापरशील. तुम्ही .... .... ..... ... .
3) शांता खंडाळ्याला जाईल. शांताबाई ..... .... .... ..... .
4) मी गावाला जाईन. आम्ही ..... .... .... ..... .
5) तू पत्र लिहिशील. तुम्ही ..... .... .... ..... .

**VIII उदाहरण के अनुसार नीचे दिए गए वाक्यों का परिवर्तन कीजिए।**

*उदाहरण:* तो शाळेत जाईल.
तो शाळेत जाणार असेल.

1) मी नाटकाला जाईन.
2) तो काम करेल.
3) ते सर्व क्रिकेट खेळतील.
4) सहलीला गेल्यावर सर्व विद्यार्थी गाणी म्हणतील.
5) मुलाच्या वाढदिवसाला ती खूप स्वादिष्ट स्वयंपाक करेल.

**IX निम्न लिखित संवाद पूरे कीजिए।**

1. मी शाळेत जाणार आहे, तू येणार आहेस का?
....... ...... ...... ..... ..... ...... ....... .
का येणार नाहीस?
...... ..... ..... ...... ....... .

म्हणजे काय होतंय?
...... ..... ..... ...... ....... .
डॉक्टरंकडे जाणार आहेस का?
...... ...... ..... ..... ...... ....... .

2. प्रिया, चल आपण आज सिनेमाला जाऊ.
....... ...... ...... ..... ..... ...... ....... .
अंग, तो 'तंबोली टॉकीज़' मधला.
...... ...... ..... ..... ...... ....... .
त्यात अमिताभ, श्रीदेवी आहेत.
...... ...... ..... ..... ...... ....... .
हो. त्यात गाणीही छान आहेत.
...... ...... ..... ..... ...... ....... .
आपल्याला घरून दोन वाजता निघावे लागेल.
....... ...... ...... ..... ..... ...... ....... .
नाही गं, पायी नको. आपण बसने जाऊया.
....... ...... ...... ..... ..... ...... ....... .

## पढ़िए और समझिए

### मनासारखे घर-एक स्वप्न!

रामभाऊंना अखेर मनासारखे घर मिळाले आहे. स्वस्त आणि मस्त! भाडं कमी पण सगळ्या सुखसोई आहेत. ते लवकरच त्या घरात जातील. कालच त्यांनी मला सांगितलं, "गोविंदरावांना घेऊन या घरी!" मी आणि आमची ही दर रविवारी जाणार असूं. तुम्हीही याल का? आपण एकदमच जाऊ या. काय म्हणता? वहिनींना जमणार नाही? ठीक आहे. तुम्ही नंतर जा. मी उद्या एखादी चक्कर टाकीन. त्यांना काही मदत लागणार असेल का, ते पाहीन. कदाचित ही देखील बरोबर येईल. नाहीतर ती आणि वहिनी नंतर जातील. जमेल तसं करू. त्यांना मदत करूया त्यांच्या आनंदात सामील होऊया.

आजकाल एकवेळ मनासारखा जावई मिळेल, मनासारखी सून मिळेल, पण भाड्यानं घर? आशाच सोडा. तशात रामभाऊंना हे घर मिळालं मग रामभाऊंचा आनंद काय सांगू? त्यांना स्वर्ग दोन बोटं उरला आहे.

### शब्दार्थ

| | |
|---|---|
| मनासारखे | मनचाहा |
| अखेर | आखिर |
| स्वस्त | सस्ता |
| मस्त | अच्छा, मजेदार |
| सुखसोई | सुखसुविधा |
| लवकरच | जल्दीही |
| सांगितले | बताया, कहा |
| घेऊन या | ले आओ |
| दर रविवारी | हर रविवार को |
| एकदम | एकाएक, अचानक |
| जमणार नाही | नहीं हो सकेगा |
| एखादी | कोई एक |
| मदत | मदद |
| कदाचित | शायद |
| नंतर | बाद में |
| जमेल तसं करु | जैसा होगा वैसा करेंगे |
| आनंदात सामील होणे | खुशी में शामिल होना |
| स्वर्ग दोन बोटे उरणे | स्वर्ग दो उंगलियों के दूरी पर होना/स्वर्गिक आनंद होना |

**अभ्यास**

**I नीचे दिए गए प्रश्नों के उत्तर मराठी मे दीजिए।**

1) रामभाऊंचे घर कसे आहे?
2) ते त्यांच्या नव्या घरी केव्हा जातील?
3) रामभाऊंचा आनंद कसा सांगितला आहे?
4) 'स्वर्ग दोन बोटं उरणं' याचा अर्थ काय?
5) हा संवाद कोणाबरोबर चालला आहे?

**II पाठ के आधार पर उपयुक्त शब्दों का प्रयोग कर वाक्य पूरे कीजिए।**

1) सध्या या भागात ........ घरं आहेत, नवीन ........ आहे ना!
2) स्वतंत्र ........ मात्र गावापासून थोडं ........ जावं लागेल.
3) चला तर, घर ........ या, आखूड शिंगी ........ ........ .
4) आजकाल एकवेळ मनासारखा ........ मिळेल मनासारखी ........ मिळेल. पण भाड्यानं घर? ........ सोडा.
5) त्यांना स्वर्ग ........ ........ उरला आहे.

III कम से कम दोष और ज्यादा से ज्यादा गुण या कम से कम नुकसान और ज्यादा फायदा दिखाने के लिए कौनसी कहावत इस पाठ में प्रयुक्त की गई है?
'बहुत ज्यादा खुशी होना' इस अर्थ का कौनसा मुहावरा इस पाठ में दिया गया है?

**IV यहाँ 'बरोबर' इस शब्द के अलग अलग अर्थ देकर वाक्य दिए गए हैं। आप इसी अर्थों के अन्य तीन वाक्य बनाइए।**

1) एक आणि एक बरोबर दोन.
2) माझ्याबरोबर वहिनी येतील.
3) तुम्ही म्हणता ते बरोबर आहे.

**V नीचे दिए गए शब्दों के समानार्थी शब्दों की जोड़ियाँ बनाइए।**

नंतर, छोटं, फार, अखेर, मस्त, एकदम, शेवटी, छान, अचानक, जास्त, लहान, मग

**VI हिंदी में अनुवाद कीजिए।**

आम्ही मराठी शिकण्यासाठी पुण्याला 'पश्चिम विभागीय भाषा केंद्रा' त जाणार आहोत. "अजय, तू सुद्धा आमच्याबरोबर चलणार का? मराठीच्या अभ्यासासाठी वर्षभर तिथे राहणे तुला जमणार आहे का? तू आलास म्हणजे मजा येईल." आपण द्वितीय भाषा म्हणून 'मराठी'च शिकणार असू. कारण मराठीत संतसाहित्य खूप आहे. "मराठी शिकणार म्हणजे फक्त भाषाच शिकणार का?" "नाही, आम्ही फक्त भाषाच शिकणार नाही. भाषेबरोबर मराठी साहित्यही शिकणार

असू आणि वाचणार असू," कारण कोणत्याही भाषेबरोबर तिच्यातील साहित्याचा अभ्यास करायला हवाच. म्हणूनच भाषा शिकता शिकता आम्ही ब.पां.किर्लोस्कर, कृ.प्र.खाडिलकर, रा.ग.गडकरी, आचार्य प्र.के.अत्रे, मो.ग.रांगणेकर, पु.ल.देशपांडे इत्यादींची नाटकं वाचू आणि पाहू. पुण्याच्या 'बालगंधर्व रंगमंदिर', 'भरत नाट्य मंदिर', 'टिळक स्मारक मंदिर' आणि 'यशवंतराव चव्हाण नाट्यगृहा' त होणारे प्रत्येक नाटक आम्ही बघू. ना.सी.फडके, वि.स.खांडेकर, गंगाधर गाडगीळ, पु.भा.भावे यांच्या कथा वाचू. बा.सी. मर्ढेकर, वसंत बापट, दया पवार, नामदेव ढसाळ यांच्या कविता वाचू. लक्ष्मण माने, हंसा वाडकर यांची आत्मकथनं अभ्यासू. तसेच ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, रामदास इ.संतांचे लेखन आम्ही वाचणार आहोतच. यांतील काही पुस्तकं आणि मराठीचा शब्दकोश आपण घेऊ. आमच्या आसपास राहणाऱ्या प्रत्येकाशी आम्ही मराठीतच बोलू. त्याचा उपयोग आम्हाला मराठी शिकण्यासाठी होईल. आम्ही मराठीतील सुंदर सुंदर वाक्प्रचार, छोट्या छोट्या अर्थपूर्ण म्हणी, मराठीचे व्याकरण, मराठी भाषेची व साहित्याची वेशिष्ट्ये शिकू. मराठी लेखकांचे छान छान अनुभव वाचू. मराठी शिकताना कोणत्याही भाषेत असणारी लिहीणे, बोलणे, वाचणे, समजणे ही प्राथमिक कौशल्ये शिकू. तसेच निबंधलेखन, पत्रलेखन, संवादलेखन, सारांशलेखन, कल्पनाविस्तार, रसग्रहण, सारग्रहण इ.भाषेची प्रगत वैशिष्ट्येही शिकू. हे करता करता आमच्यातील प्रत्येकजण मराठी भाषेसह मराठी संस्कृतीशीही परिचित होणार असेल. कारण भाषा म्हणजे संस्कृतीचे एक अविभाज्य अंग असते. भाषा संस्कृतीतूनच निर्माण होत असते. संस्कृती भाषेला समृद्ध करीत असते. संस्कृतीशिवाय कोणत्याही भाषेचा विचार पूर्ण होणार नाही. आम्ही मराठी शिकणार म्हणजे महाराष्ट्र, मराठी माणूस जाणून घेऊ. आमची सगळ्यांची मातृभाषा हिंदी आहे. त्यामुळे मराठी शिकणे आम्हाला कठीण जाणार नाही. मराठी शिकून आमचा शब्दसंग्रह वाढेल. त्याचा आम्हाला भविष्यात निश्चितच उपयोग होईल. म्हणूनच आम्ही मराठी शिकणार आहोत. आम्ही मराठी शिकायला पुण्याला जाणार म्हणजे आम्ही चांगलं मराठी नक्की शिकणार. मला विश्वास आहे की, आम्ही 'पश्चिम विभागीय भाषा केंद्रा' त जाणार म्हणजे उत्तम मराठी शिकणारच. मराठी भाषा शिकून आम्ही आमचे ज्ञान व व्यक्तिमत्व अधिक समृद्ध आणि संपन्न करू.

**VII मराठी में अनुवाद कीजिए।**

जब शहर बढ़ेंगे तो नई समस्याएँ बढ़ेंगी ही। बाहर से आए लोगों को मकान चाहिए होंगे और नौकरी भी होगी। जितनी जनसंख्या बढ़ेगी उतनीही चीजों की माँग बढनेवाली होगी। नई-नई आवश्यकताओं को पूरा करने के लिए व्यवसायों को बढ़ाना होगा। जितना सबको चाहिए उतना देने के लिए योजनाएँ बनानी होंगी। यदि ऐसा नीहं होगा तो समाज सुखशांति से नहीं रह सकेगा।

**VIII मकान ढूँढने के विषय में आप के अनुभवों पर मराठी में एक अनुच्छेद लिखिए।**

## टिप्पणियाँ

I इस पाठ में निम्न प्रकार के वाक्यों का परिचय दिया गया हैं।

*उदाहरण:*

| | | |
|---|---|---|
| 1) | मग एखादा फ्लॅट मिळेल. | तब तो एकाध फ्लैट मिलेगा। |
| 2) | तासाभरात परत येईन. | एक घंटे में वापस आऊँगा। |
| 3) | चला तर, आपण घर शोधू. | चलो चलें, हम घर ढूँढेंगे। |

उपर्युक्त वाक्यों में रेखांकित क्रिया रूपों पर ध्यान दीजिए। उन में सामान्य भविष्यत काल का प्रयोग किया गया है। मराठी में सामान्य भविष्यत काल के क्रिया रूप बनाने के लिए निम्नलिखित प्रत्यय पुरुष और वचन के अनुसार मूल क्रिया में जोडे जाते हैं।

| *उदाहरण:* | *एकवचन* | *बहुवचन* |
|---|---|---|
| *उत्तमपुरुष* | जा + ईन = जाईन (जाऊँगा) | जा+ ऊ = जाऊ (जाएँगे/जाएँगी) |
| | कर + ईन = करीन (करूँगा/करूँगी) | कर + ऊ = करू (करेंगे/करेंगी) |
| *मध्यमपुरुष* | जा + शील = जाशील (जाएगा) | जा + आल = जाल (जाओगे) |
| | कर + शील = करशील (करेगा) | कर + आल = कराल (करोगे) |
| *अन्य पुरुष (पु.)* | जा + ईल = जाईल (जाएगा) | जा + तील = जातील (जाएँगे) |
| *(पु.)* | कर + एल = करेल (करेगा) | कर + तील = करतील (करेंगे) |
| *(स्त्री.)* | जा + ईल = जाईल (जाएगी) | जा + तील = जातील (जाएँगी) |
| *(स्त्री.)* | कर + एल = करेल (करेगी) | कर + तील = करतील (करेंगी) |
| *(नपुं.)* | जा + ईल = जाईल | जा + तील = जातील |
| *(नपुं.)* | कर + एल = करेल | कर + तील = करतील |

**क्रिया - जा**

| | *एकवचन* | *बहुवचन* |
|---|---|---|
| *उत्तमपुरुष* | मी जाईन.<br>मैं जाऊँगा/जाऊँगी। | आम्ही / आपण } जाऊ. हम जाएँगे। |
| *मध्यमपुरुष* | तू जाशील.<br>तुम जाओगे। | तुम्ही / आपण } जाल. आप जाओगे । |
| *अन्यपुरुष* | तो / ती / ते } जाईल.<br>वह जाएगा/जाएगी। | ते / त्या / ती } जातील.<br>वे जाएँगे/जाएँगी। |

**क्रिया - बस**

| | *एकवचन* | | *बहुवचन* | |
|---|---|---|---|---|
| *उत्तमपुरुष* | मी बसेन.<br>मैं बैठूँगा। | | आम्ही<br>आपण | बसू.<br>हम बैठेंगे। |
| *मध्यमपुरुष* | तू बसशील.<br>तुम बैठोगे। | | तुम्ही<br>आपण | बसाल.<br>आप बैठेंगे/बैठेंगी। |
| *अन्यपुरुष* | तो<br>ती<br>ते | बसेल.<br>वह बैठेगा/बैठेगी। | ते<br>त्या<br>ती | बसतील.<br>वे बैठेंगे/बैठेंगी। |

ध्यान दे कि, मराठी में सामान्य भविष्यत् काल में क्रिया पर लिंग का कोई प्रभाव नहीं पडता। अन्य पुरुष एकवचन में स्वरांत धातुओं के ('जा') साथ '-एल' के स्थानपर '-ईल' प्रत्यय जुडता है।

2. मराठी में 'भविष्यत काल' के वैकल्पिक रूप निम्नप्रकार से होते हैं।

| | *एकवचन* | | *बहुवचन* | |
|---|---|---|---|---|
| *उत्तमपुरुष* | मी जाणार आहे.<br>मैं जाने वाला हूँ।<br>मैं जाने वाली हूँ। | | आम्ही<br>आपण | जाणार आहोत.<br>हम जानेवाले हैं। |
| *मध्यमपुरुष* | तू जाणार आहेस.<br>तुम जानेवाले/वाली हो। | | तुम्ही<br>आपण | जाणार आहात.<br>आप जाने वाले/वाली हैं। |
| *अन्यपुरुष* | तो<br>ती<br>ते | जाणार आहे<br>वह जाने<br>वाला/वाली है। | ते<br>त्या<br>ती | जाणार आहेत.<br>वे जाने वाले/वाली हैं। |

उपर्युक्त वैकल्पिक भविष्यत् कालिक रूप मूल क्रिया में '-णार' प्रत्यय लगाकर उसके बाद योजक क्रिया 'आहे' (है) के उपयुक्त रूपों का प्रयोग कर बनते हैं।

3. मराठी में भविष्यत् काल के निषेधवाचक रूप बनाने के लिए केवल वैकल्पिक रूप 'जाणार आहे' में 'आहे' के स्थान पर 'नाही' का प्रयोग किया जाता है।

*उदाहरण:* मी यांच्याबरोबर बाहेर जाणार आहे.
मैं इनके जरा बाहर जाऊँगा।
मी यांच्याबरोबर बाहेर जाणार नाही.
मैं इनके साथ बाहर नाहीं जाऊँगा।

'मी जाईन' का भी निषेधवाचक रूप 'मी जाणार नाही' ही होगा।

4. नीचे दिए गए वाक्यों पर ध्यान दीजिए।

*उदाहरण:*

1) ते तुम्हाला चालणार का? वह आप के लिए ठीक रहेगा क्या?
2) ते तुम्हाला चालणार आहे का? वह आप के लिए ठीक रहेगा क्या?

मराठी में प्रश्न वाचक वाक्यों में 'आहे' योजक क्रिया का प्रयोग ऐच्छिक रूप से होता है। उसका प्रयोग अनिवार्य नही हैं। मराठी में प्रश्न वाचक वाक्यों में 'आहे' योजक क्रिया बहुधा छोड दी जाती है। उपर्युक्त दोनों प्रश्नवाचक वाक्यों का अर्थ एक ही है।

5. निम्नलिखित वाक्यों के क्रियारूपों पर ध्यान दीजिए।

*उदाहरण:*

1) आपण आता चांगलं घर शोधणार आहोत.
   हम अब अच्छा घर ढूँढनेवाले हैं।
2) मग आपण चांगलं घर नक्की शोधणार.
   फिर हम अच्छा मकान जरूर ढूँढेंगे।
3) आम्ही तुमच्यासारख्या घनिष्ठ मित्रासाठी चांगलं घर शोधणारच.
   हम तुम्हारे जैसे घनिष्ठ मित्र के लिए अच्छा मकान ढूँढेंगे ही।

उपर्युक्त उदाहरण (1) में रेखांकित क्रिया शब्दों में सामान्य भविष्यत काल का प्रयोग किया गया है। उदाहरण (2) में 'आहोत' का प्रयोग नहीं किया गया है। मराठी में संकल्प या पूर्ण संभावना व्यक्त करने के लिए 'आहे' (है) योजक क्रिया को छोड दिया जाता है। उदाहरण (3) में क्रिया शब्द के साथ '-च' प्रत्यय का प्रयोग किया गया है। मराठी में संकल्प पर अधिक बल देने के लिए क्रिया शब्द के सामान्य भविष्यत् कालिक रूप के अंत में '-च' प्रत्यय जोडते हैं।

6. मराठी में शब्दों में '-सा', '-शी', '-से' प्रत्यय लगाकर शब्दों में एक प्रकार की मिठास लाई जाती है।

*उदाहरण:* छोटा + सा = छोटासा - छोटासा बंगला.
छोटा + शी = छोटीशी - छोटीशी झोपडी.
छोट + से = छोटसे - छोटेसे घर.

लहानसा, लहानशी, लहानसे. (छोटासा, छोटीसी)
छानसा, छानशी, छानसे. (अच्छास, अच्छीसी)
गोडसा, गोडशी, गोडसे. (मीठासा, मीठीसी)
थोडासा, थोडीशी, थोडेसे. (थोडासा, थोडीसी)
फारसा, फारशी, फारसे. (बहुतसा, बहुतसी)

7. मराठी में शब्दों की पुनरावृत्ति कर अर्थ की सघनता बढाई जाती है।
*उदाहरण:* गोड गोड गाणी (मीठे मीठे गाने)
छान छान चित्र (अच्छे अच्छे चित्र)
मंद मंद सुगंध (मंद मंद सुगंध)
सुंदर सुंदर फुलं (सुंदर सुंदर फूल)

8. मराठी में कुछ समानार्थी या विलोम शब्द साथ साथ जोडे जाते हैं।
मराठी में ऐसे शब्द प्रयोगों में 'सर्वसमावेशकता' का अर्थ अंतर्भूत होता है।
*उदाहरण:* जवळपास (आसपास), आसपास (आसपास), आजूबाजूला (आजूबाजू), फुटकातुटका (टूटाफूटा), ख्यालीखुशाली, असूननसून, मागेपुढे (आगेपीछे), आतबाहेर (अंदरबाहर), इकडेतिकडे (इधरउधर), जिथेतिथे (जहाँवहाँ), जिकडेतिकडे (जिधरउधर), उलटासुलटा (उलटासीधा)

9. नीचे दिए गए वाक्यों में रेखांकित क्रियारूपों पर ध्यान दीजिए।
1) स्वतंत्रच घर शोधणार असाल नं तुम्ही?
2) आम्ही तासाभरात परत येणार असू.

उपर्युक्त वाक्यों में रेखांकित क्रियारूपों से संभाव्य भविष्यत् काल का बोध कराया गया है। मराठी में ऐसे वाक्यों में मूल क्रिया को '-णार' प्रत्यय लगाकर अंत में 'अस' या 'नस' के उपयुक्त रूपों का प्रयोग होता हैं। इसी प्रकार से बननेवाले 'जा' मूल क्रिया के सभी संभाव्य भविष्यत्कालिक क्रिया रूप नीचे दिए गए हैं।

| | *एकवचन* | *बहुवचन* |
|---|---|---|
| *उ.पु.* | मी गावाला जाणार असेन.<br>मैं गाँव जानेवाला होऊँगा। | आम्ही/आपण गावाला<br>हम गाँव जानेवाले होंगे। |
| *म.पु.* | तू गावाला जाणार असशील.<br>तुम गाँव जानेवाले होगे। | तुम्ही/आपण गावाला जाणार असाल. |
| *अ.पु.* | तो गावाला जाणारा असेल.<br>वह गाँव जानेवाला होगा।<br>ती गावाला जाणार असेल.<br>वह गाँव जानेवाली होगी।<br>ते गावाला जाणारा असेल. | ते / त्या / ती } गावाला जाणार असतील.<br>वे गाँव जानेवाले होंगे।<br>वे गाँव जाने वाली होंगी। |